## ७. पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता

| | |
|---|---|
| ७.१ | अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा) व अनुसूचित क्षेत्रामध्ये (पेसा) भरावयाच्या पदांची शैक्षणिक अर्हता **परिशिष्ट (ब)** मध्ये दर्शविण्यात आलेली आहेत. |

**परिशिष्ट (ब)**

**अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा) व अनुसूचित क्षेत्रामधील (पेसा) पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता**

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| | **अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा)** | |
| १ | आरोग्य पर्यवेक्षक | ज्यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी धारण केलेली असेल आणि ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्याचा पाठ्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| २ | आरोग्य सेवक (पुरूष) ४०% | विज्ञान विषय घेवुन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार. ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक राहिल. |
| ३ | आरोग्य सेवक (पुरूष) ५०% | विज्ञान विषय घेवुन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार, राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणुन ९० दिवसांचा अनुभव धारकांना प्राधान्य देण्यात येईल.<br>ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक राहिल. |
| ४ | आरोग्य सेवक (महिला) | ज्यांची अर्हता प्राप्त साह्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. |
| ५ | औषध निर्माण अधिकारी | औषध निर्माण शास्त्रातील पदवी किंवा पदविका धारण करणारे आणि औषध शाळा अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते असलेले उमेदवार |
| ६ | कंत्राटी ग्रामसेवक | किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० % गुणांसह उत्तीर्ण किंवा शासन मान्य संस्थेची अभियंत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासन मान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी एस डब्ल्यु) किंवा माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता आणि कृषि पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम किंवा कृषि विषयाची पदवी किंवा उच्च अर्हता धारण |

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| | | करणाऱ्या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामीण अनुभव असलेले उमेदवारांना अधिक पसंती.<br>संगणक हातळणी वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. |
| ७ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / ग्रा.पा.पु. / लघु पाटबंधारे) | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठ्यक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करत असतील असे उमेदवार |
| ८ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | यंत्र अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठ्यक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करत असतील असे उमेदवार |
| ९ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | विद्युत अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठ्यक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करत असतील असे उमेदवार |
| १० | कनिष्ठ आरेखक | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र उत्तीर्ण झालेले असतील किंवा तुल्य अर्हता धारण करीत आतील आणि ज्यांनी शासनाने मान्यता दिलेला स्थापत्य आरेखकाचा पाठ्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला असेल असे उमेदवार |
| ११ | कनिष्ठ यांत्रिकी | ज्यांनी तांत्रिक शिक्षण विभागाच्या यांत्रिकी विषयातील अल्पमुदतीचा पाठ्यक्रम पूर्ण केला असेल किंवा जे समतुल्य अर्हता धारण करीत असतील असे उमेदवार आणि<br>रूळ मार्ग किंवा वाफेवर किंवा तेलावर चालणारे (रोड रोलर) दुरूस्त करणे इत्यादींचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव असेल असे उमेदवार |
| १२ | कनिष्ठ लेखाधिकारी | ज्यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केली असेल व कोणतेही सरकारी कार्यालय व्यापारी भागीदार संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील किमान ५ वर्षाचा अखंड सेवेचा ज्यांना अनुभव असेल अशा उमेदवारामधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल. या बाबतीत लेखाशास्त्र आणि लेखा परीक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्यांना अथवा प्रथम वा व्दितीय वर्गातील पदवी धारण करणा-यांना अधिक पसंती दिली जाईल किंवा गणित अथवा सांख्यिकी अथवा लेखा शास्त्र व लेखा परिक्षा हे प्रमुख विषय घेऊन पदव्युत्तर पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल. याबाबतीत कोणत्याही सरकारी कार्यालयातील अथवा व्यापारी संस्थेतील अथवा स्थानिक प्राधीकरणातील लेखा कार्याचा अनुभव असणाऱ्यास अधिक पसंती दिली जाईल. |

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| १३ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्यांनी मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनीटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील असे उमेदवार<br>परंतु उक्त दोन भाषांपैकी कोणत्याही एका भाषेतील गतीच्या प्रमाणपत्रानुसार नियुक्त केलेले उमेदवार, नियुक्त केलेल्या तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीत दुसऱ्या भाषेतील दर मिनीटास ३० शब्दांहून कमी नाही अशा टंकलेखनाच्या गतीचे प्रमाणपत्र मिळवतील असे उमेदवार |
| १४ | कनिष्ठ सहाय्यक लेखा | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार तसेच महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी मराठी टंकलेखनाचे दर मिनिटास ३० शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये ५० टक्के गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. |
| १५ | जोडारी | जे उमेदवार चौथी उत्तीर्ण झाले असतील<br>ज्यांना<br>किमान दोन वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असेल, शासकीय तंत्र शाळेतून विहित केलेला जोडाऱ्याचा पाठ्यक्रम किंवा तुल्य पाठ्यक्रम उत्तीर्ण झाले असतील. |
| १६ | तारतंत्री | महाराष्ट्र शासनाच्या अनुज्ञापन मंडळाने दिलेले तारतंत्रीचे दुसऱ्या वर्गाचे प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील असे उमेदवार |
| १७ | पर्यवेक्षिका | ज्यांनी पदवी धारण केली आहे असे महिला उमेदवार |
| १८ | पशुधन पर्यवेक्षक | (दोन) (अ) संविधिक विद्यापीठाची, पशुवैद्यक शास्त्रातील पदवी धारण करीत असलेल्या व्यक्ती, किंवा<br>(ब) पशुधन पर्यवेक्षक, पशुपाल, पशुधन सहाय्यक, सहायक पशुधन विकास अधिकारी किंवा पशुधन विकास अधिकारी (ब श्रेणी) या बाबतची पशुसंवर्धन संचालनालयाने दिलेली पुढील पदविका किंवा प्रमाणपत्र |

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| | | धारण करणा-या व्यक्ती.<br>(१)त्यावेळच्या मुंबई राज्याने चालविलेल्या अभ्यासक्रमासह, पशुवैद्यक पशुपाल प्रशिक्षण अभ्यासक्रम<br>(२) पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन आणि राज्यातील विविध संविधीक कृषि विद्यापीठे यांनी चालविलेल्या पशुधन पर्यवेक्षक अभ्यासक्रम<br>(३) पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी चालविलेला पशुवैद्यक व पशुसंवर्धन शास्त्रामधील दोन वर्षाचा सेवांतर्गत पदविका अभ्यासक्रम (आणि),<br>(४) खालील संस्थांनी चालविलेला पशुवैद्यक शास्त्र विषयासह दुग्धशाळा व क्षेत्र व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका या मधील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम,<br>(एक)महाराष्ट्र तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, किंवा<br>(दोन) राज्यातील विविध संविधीक कृषी विद्यापीठे किंवा<br>किंवा<br>५) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्यामार्फत चालविण्यात येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>(ब) ज्यामुळे नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीच्या पर्यवेक्षणाखाली व निदेशनाखाली किरकोळ पशुवैद्यकिय सेवा करण्याचा हक्क असेल अशी, भारतातील कोणत्याही पशुवैद्यक संस्थेची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती.<br>परंतु किरकोळ पशुवैद्यकीय सेवा करण्याचा त्यांना हक्क मिळवून देणा-या पदविकेचा किंवा प्रमाणपत्राचा धारक भारतीय पशुवैद्यकीय परिषद अधिनियम १९८४ (१९८४ चा ५२ याच्या कलम ३० च्या खंड(ख) च्या परंतुकातील स्पष्टीकरणान्वये व कलम ५७ अन्वये कृषि पशुसंव र्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात काढलेल्या क्र आयव्हीसी १००६ प्रक्र ५३२/पदुम -४ दि २७ ऑगस्ट २००९ च्या अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या किरकोळ पशुवैद्यकिय सेवाच देण्यास हक्कदार असेल<br>(तीन) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून वेळोवेळी विहित केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. |

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| १९ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ज्याने मुख्य विषय म्हणुन भौतीकशास्त्र किंवा रसायनशास्त्र अथवा जीवशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र अथवा प्राणीशास्त्र किंवा सुक्ष्म जीवशास्त्र यासह विज्ञान विषयामध्ये पदवी धारण केली असेल अशा उमेदवारातून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल.<br>(परंतु हाफकिन संस्थेच्या वैद्यकिय प्रयोगशाळा तंत्रशास्त्रामध्ये पदविका धारण करीत असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.) |
| २० | यांत्रिकी | दोन) शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली असावी अथवा शासनाने तिच्याशी समतुल्य म्हणून जाहीर केलेली अन्य कोणतीही अर्हता असावी<br>तीन) त्याच्याकडे शासनाच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था अथवा मान्यता प्राप्त संस्था मधील तांत्रिक विद्युत अथवा ऑटोमोबाईल अभियांत्रिकी मधील प्रमाणपत्र असावे.<br>चार) वरील उपखंड (दोन) व तीन मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता संपादन केल्यानंतर त्यास ऑटोमोबाईल व न्युमॅटिक मशीनच्या देखभाली व दुरूस्तीचा १ वर्षापेक्षा कमी अनुभव नसावा.<br>पाच) तो जड वाहन चालविण्याचा वैद्य परवाना धारक असावा. परंतू विहित केलेली वयोमर्यादा अथवा अनुभव संवर्गाची शर्त अथवा ही दोन्हीही असाधारण अर्हता किंवा असाधारण अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत शासन निवड मंडळाच्या शिफारशीनुसार शिथील करू शकेल. |
| २१ | रिगमन (दोरखंडवाला) | शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अथवा तिच्याशी समतुल्य जाहिर शैक्षणिक अर्हता आणि जड माल वाहन अथवा जड प्रवासी वाहनाचा, जड वाहन कामाचा वैध परवानाधारक असेल तर त्यास जड माल वाहनाचा अथवा जड प्रवासी वाहनाचा चालविण्याचा एक वर्षापेक्षा कमी अनुभव नसावा.<br>ज्यांच्याकडे विंधन यंत्राद्वारे खुदाईचा २ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य. |
| २२ | लघुटंकलेखक | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तिच्याशी समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार आणि<br>आयुक्त, शासकीय परीक्षा केंद्र, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिलेले किंवा या नियमांच्या प्रयोजनार्थ शासनाकडून विनिर्देशपूर्वक मान्यता देण्यात येईल अशा अन्य संस्थेने दिलेले इंग्रजी किंवा मराठी लघुलेखनातील दर मिनिटास ८० शब्दांपेक्षा कमी नसेल व इंग्रजी टंकलेखनातील दर मिनिटास ४० शब्दापेक्षा कमी नसेल किंवा मराठी टंकलेखनातील ३० शब्दांपेक्षा कमी नसेल इतक्या वेगाचे |

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| | | प्रमाणपत्र धारण करतील असे उमेदवार |
| २३ | लघुलेखक (उ.श्रे.) | महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असलेले उमेदवार तसेच आयुक्त शासकीय परिक्षा विभाग, शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिलेले किंवा या नियमांचे प्रयोजनार्थ शासनाकडुन विनिर्देशपूर्वक मान्यता देण्यात आलेल्या अन्य कोणत्याहीसंस्थेने दिलेले इंग्रजी किंवा मराठी लघुलेखनातील दर मिनिटास १२० श.प्र.मि. पेक्षा कमी नसेल इतक्या गतीचे (ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय ६ जानेवारी १९९७ अन्वये) आणि इंग्रजी टंकलेखनातील दर मिनिटास ४० श.प्र.मि किंवा मराठी टंकलेखनातील दर मिनिटास ३० श.प्र.मि. कमी नसेल इतक्या गतीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक |
| २४ | लघुलेखक (नि.श्रे.) | महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असलेले उमेदवार तसेच आयुक्त शासकीय परिक्षा विभाग, शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिलेले किंवा या नियमांचे प्रयोजनार्थ शासनाकडुन विनिर्देशपूर्वक मान्यता देण्यात आलेल्या अन्य कोणत्याही संस्थेने दिलेले इंग्रजी किंवा मराठी लघुलेखनातील दर मिनिटास १०० श.प्र.मि.पेक्षाकमी नसेल इतक्या गतीचे (ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय ६ जानेवारी १९९७ अन्वये) आणि इंग्रजी टंकलेखनातील दर मिनिटास ४० श.प्र.मि किंवा मराठी टंकलेखनातील दर मिनिटास ३० श.प्र.मि. कमी नसेल इतक्या गतीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक |
| २५ | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | संविधिमान्य विद्यापीठाची पदवी प्रमाणपत्र धारण करणारे उमेदवार |
| २६ | वरिष्ठ सहाय्यक लेखा | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील या बाबत लेखा शास्त्र व लेखा परिक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा पहिल्या किंवा दुस-या वर्गातील पदवी धारण करणा-या आणि कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधी पर्यंत लेखा विषयक कामांचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल. |
| २७ | विस्तार अधिकारी (कृषि) | ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषि विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही अर्हता धारण केली असेल अशा उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. परंतू कृषि विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता आणि कृषि विषयक कामाचा अनुभव किंवा कृषि पद्धतीचे व्यवसायाचे ज्ञान व ग्रामीण जीवनाचा अनुभव असेल अशा |

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| | | उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| २८ | विस्तार अधिकारी (पंचायत) | जे उमेदवार विधिद्वारे संस्थापित विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील असे उमेदवार<br>परंतू ग्रामीण समाजकल्याण व स्थानिक विकास कार्यक्रमांचा तीन वर्षाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य |
| २९ | विस्तार अधिकारी (शिक्षण) (वर्ग३ श्रेणी२) | कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ए./बी.कॉम./ बी.एस.सी. ही पदवी किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण केली असेल आणि ज्यांनी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एड. अथवा समकक्ष पदवी किमान ५०% गुणांसह उत्तीर्ण केली असेल आणि ज्यांना मान्यताप्राप्त प्राथमिक / माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय, अध्यापक विद्यालयातील शासनमान्य पदावरील सक्षम प्राधिकाऱ्याने वैयक्तीक मान्यता दिलेला किमान तीन वर्षाचा अध्यापनाचा किंवा प्रशासनाचा अनुभव आहे, असे उमेदवार |
| ३० | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | संविधिमान्य विद्यापिठाची विज्ञान, कृषि, वाणिज्य किंवा वाङ्:मय शाखेची अर्थशास्त्र किंवा गणित अथवा सांख्यिकी विषयासह प्रथम अगर द्वितीय वर्गातील पदवी धारण करीत असतील किंवा ज्यांना नमुना सर्वेक्षण करण्याचा अनुभव असेल, किंवा पदवी व अनुभव दोन्ही असतील असे उमेदवार<br>परंतु, अशा विषयांपैकी एका विषयाची स्नातकोत्तर पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल |
| ३१ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (स्थापत्य / लघु पाटबंधारे) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्षाचा पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार संविधीमान्य तत्सम खालील पाठ्यक्रम १) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या एक वर्षाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण किंवा २) आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन (वास्तुशास्त्रीय आरेखक), किंवा ३) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) किंवा ४) आरेखक (स्थापत्य) हा दोन वर्षाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण किंवा ५) सैनिकी सेवेतील बांधकाम पर्यवेक्षकाचे अनुभव प्रमाणपत्र किंवा स्थापत्य अभियांत्रिकी मध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी स्थापत्य मध्ये धारण करीत असतील असे उमेदवार<br>परंतू ज्यांनी १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्रशिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्या येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची एक वर्षे मुदतीची पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. अशा उमेदवारांच्या बाबतीतशासकीय तंत्र शिक्षण |

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| | | विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधीन राहून वयोमर्यादा ४७ इतकी शिथील करता येईल. |
| | **अनुसूचित क्षेत्रामधील (पेसा)** | |
| १ | आरोग्य सेवक पुरूष (४०%) | विज्ञान विषय घेवुन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार. ज्यांनी बहुउददेशिय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक राहिल. |
| २ | आरोग्य सेवक पुरूष (५०%) | विज्ञान विषय घेवुन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार, राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणुन ९० दिवसांचा अनुभव धारकांना प्राधान्य देण्यात येईल.<br>ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा १२ महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक राहिल. |
| ३ | आरोग्य सेवक महिला (१००%) | ज्यांची अर्हता प्राप्त साह्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. |
| ४ | कंत्राटी ग्रामसेवक | किमान उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० % गुणांसह उत्तीर्ण किंवा शासन मान्य संस्थेची अभियंत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासन मान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी एस डब्ल्यु) किंवा माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता आणि कृषि पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम किंवा कृषि विषयाची पदवी किंवा उच्च अर्हता धारण करणाऱ्या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामीण अनुभव असलेले उमेदवारांना अधिक पसंती.<br>संगणक हातळणी वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. |
| ५ | पर्यवेक्षिका | ज्यांनी पदवी धारण केली आहे असे महिला उमेदवार |
| ६ | पशुधन पर्यवेक्षक | (दोन) (अ) संविधिक विद्यापीठाची, पशुवैद्यक शास्त्रातील पदवी धारण करीत असलेल्या व्यक्ती, किंवा<br>(ब) पशुधन पर्यवेक्षक, पशुपाल, पशुधन सहाय्यक, सहायक पशुधन विकास अधिकारी किंवा पशुधन विकास अधिकारी (ब श्रेणी) या बाबतची पशुसंवर्धन संचालनालयाने दिलेली पुढील पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणा-या |

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| | | व्यक्ती.<br>(१)त्यावेळच्या मुंबई राज्याने चालविलेल्या अभ्यासक्रमासह, पशुवैद्यक पशुपाल प्रशिक्षण अभ्यासक्रम<br>(२) पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन आणि राज्यातील विविध संविधीक कृषि विद्यापीठे यांनी चालविलेल्या पशुधन पर्यवेक्षक अभ्यासक्रम<br>(३) पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी चालविलेला पशुवैद्यक व पशुसंवर्धन शास्त्रामधील दोन वर्षाचा सेवांतर्गत पदविका अभ्यासक्रम (आणि),<br>(४) खालील संस्थांनी चालविलेला पशुवैद्यक शास्त्र विषयासह दुग्धशाळा व क्षेत्र व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका या मधील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम,<br>(एक)महाराष्ट्र तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, किंवा<br>(दोन) राज्यातील विविध संविधीक कृषी विद्यापीठे किंवा<br>किंवा<br>५) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्यामार्फत चालविण्यात येणारा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण<br>(ब) ज्यामुळे नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीच्या पर्यवेक्षणाखाली व निदेशनाखाली किरकोळ पशुवैद्यकिय सेवा करण्याचा हक्क असेल अशी, भारतातील कोणत्याही पशुवैद्यक संस्थेची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती.<br>परंतु किरकोळ पशुवैद्यकीय सेवा करण्याचा त्यांना हक्क मिळवून देणा-या पदविकेचा किंवा प्रमाणपत्राचा धारक भारतीय पशुवैद्यकीय परिषद अधिनियम १९८४ (१९८४ चा ५२ याच्या कलम ३० च्या खंड(ख) च्या परंतुकातील स्पष्टीकरणान्वये व कलम ५७ अन्वये कृषि पशुसंव र्धन दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात काढलेल्या क्र आयव्हीसी १००६ प्रक्र ५३२/पदुम -४ दि २७ ऑगस्ट २००९ च्या अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या किरकोळ पशुवैद्यकिय सेवाच देण्यास हक्कदार असेल<br>(तीन) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून वेळोवेळी विहित केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. |
| | अनुभव<br>१. वरील सर्व पदाच्या मूळ कागदपत्रे तपासणीवेळी उमेदवाराने सादर करावयाच्या अनुभव | |

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|
| | | प्रमाणपत्रामध्ये उपरोक्त नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पद्धतीमध्ये नमूद अनुभवामधील प्रशासकीय कर्तव्ये व जबाबदाऱ्या याचे स्वरूप असलेला अनुभव नमूद करणे आवश्यक आहे. तसेच अनुभव सिद्ध करणारे दस्तऐवज सादर करणे आवश्यक राहील.<br>२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक - एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/०४/१२, दि. ०३/०७/२००४ अन्वये नियुक्तीसाठी विहित केल्यानुसार अनुभव ग्राह्य धरणेत येईल. |

<u>वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.</u>

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| १) | संगणक अर्हता | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदी नुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस२०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४.२.२०१३ व शासन पुरक पत्र क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९ दिनांक ८.१.२०१८ मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता बंधनकारक आहे. |
| २) | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.<br>या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटूंब याचा अर्थ, दोन अपत्ये यांसह पत्नी व पती असा आहे. |

## ८. पदनिहाय वेतनश्रेणी

| | |
|---|---|
| ८.१ | सरळसेवेने भरवयाच्या **परिशिष्ट (अ-१) व परिशिष्ट (अ-२)** मध्ये नमूद केलेल्या संवर्गाची वेतनश्रेणी सोबतचे **परिशिष्ट (क)** मध्ये नमूद करणेत आलेली आहे. |

**परिशिष्ट (क)**

अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा) व अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) पदांची वेतनश्रेणी

| अ. क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा) | | |
| १ | आरोग्य पर्यवेक्षक | एस-१३ (३५४००-११२४००) |
| २ | आरोग्य सेवक (पुरूष) ४०% | एस-८ (२५५००-८११००) |
| ३ | आरोग्य सेवक (पुरूष) ५०% | एस-८ (२५५००-८११००) |
| ४ | आरोग्य सेवक (महिला) | एस-८ (२५५००-८११००) |
| ५ | औषध निर्माण अधिकारी | एस-१० (२९२००-९२३००) |
| ६ | कंत्राटी ग्रामसेवक | ₹ ६०००/- दरमहा मानधन |
| ७ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य / ग्रा.पा.पु. / लघु पाटबंधारे) | एस-१४ (३८६००-१२२८००) |
| ८ | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | एस-१४ (३८६००-१२२८००) |
| ९ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | एस-१४ (३८६००-१२२८००) |
| १० | कनिष्ठ आरेखक | एस-८ (२५५००-८११००) |
| ११ | कनिष्ठ यांत्रिकी | एस-६ (१९९००-६३२००) |
| १२ | कनिष्ठ लेखाधिकारी | एस-१३ (३५४००-११२४००) |
| १३ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | एस-६ (१९९००-६३२००) |
| १४ | कनिष्ठ सहाय्यक लेखा | एस-६ (१९९००-६३२००) |
| १५ | जोडारी | एस-६ (१९९००-६३२००) |
| १६ | तारतंत्री | एस-६ (१९९००-६३२००) |
| १७ | पर्यवेक्षिका | एस-१३ (३५४००-११२४००) |
| १८ | पशुधन पर्यवेक्षक | एस-८ (२५५००-८११००) |
| १९ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | एस-१३ (३५४००-११२४००) |
| २० | यांत्रिकी | एस-८ (२५५००-८११००) |
| २१ | रिगमन (दोरखंडवाला) | एस-७ (२१७००-६९१००) |
| २२ | लघुटंकलेखक | एस-८ (२५५००-८११००) |
| २३ | लघुलेखक (उच्च श्रेणी) | एस-१५ (४१८००-१३२३००) |
| २४ | लघुलेखक (निम्न श्रेणी) | एस-१४ (३८६००-१२२८००) |
| २५ | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | एस-८ (२५५००-८११००) |
| २६ | वरिष्ठ सहाय्यक लेखा | एस-८ (२५५००-८११००) |
| २७ | विस्तार अधिकारी (कृषि) | एस-१३ (३५४००-११२४००) |
| २८ | विस्तार अधिकारी (पंचायत) | एस-१३ (३५४००-११२४००) |
| २९ | विस्तार अधिकारी (शिक्षण) (वर्ग३ श्रेणी२) | एस-१५ (४१८००-१३२३००) |
| ३० | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | एस-१३ (३५४००-११२४००) |

| अ. क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी |
|---|---|---|
| ३१ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (स्थापत्य / लघु पाटबंधारे) | एस-८ (२५५००-८११००) |
| | **अनुसूचित क्षेत्रातील (पेसा)** | |
| १ | आरोग्य सेवक पुरूष (४०%) | एस-८ (२५५००-८११००) |
| २ | आरोग्य सेवक पुरूष (५०%) | एस-८ (२५५००-८११००) |
| ३ | आरोग्य सेवक महिला (१००%) | एस-८ (२५५००-८११००) |
| ४ | कंत्राटी ग्रामसेवक | ₹ ६०००/- दरमहा मानधन |
| ५ | पर्यवेक्षिका | एस-१३ (३५४००-११२४००) |
| ६ | पशुधन पर्यवेक्षक | एस-८ (२५५००-८११००) |

## ९. परीक्षेचे स्वरूप, दर्जा व निवडीची कार्यपद्धती

| | |
|---|---|
| ९.१ | सर्व पदांसाठीचे परीक्षेचे स्वरूप व दर्जा **परिशिष्ट (ड)** मध्ये दर्शविण्यात आलेले आहे. |
| ९.२ | सर्व पदांकरीता ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली जाईल. |
| ९.३ | **ऑनलाईन** परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही. |
| ९.४ | ज्या पदांकरिता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहिल. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहिल. |
| ९.५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), औषध निर्माण अधिकारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, विस्तार अधिकारी (कृषि) या तांत्रिक संवर्गातील पदांच्या तांत्रिक भागाचे प्रश्न इंग्रजी माध्यमातून राहतील. |
| ९.६ | ऑनलाईन पद्धतीने परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपात आयोजित केली जाईल. प्रत्येक प्रश्नास एकूण २ गुण याप्रमाणे १०० प्रश्नांसाठी २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. त्याकरीता १२० मिनीटे इतका कालावधी देण्यात येईल. |
| ९.७ | गुणवत्ता यादीमध्ये अंतर्भाव होण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहिल. |
| ९.८. | महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३- अ दिनांक ४ मे २०२२ अन्वये गट-क मधील पदांसाठी मौखिक परीक्षा घेतली जाणार नाही. |
| ९.९ | उमेदवारांना परीक्षेकरीता अर्ज करताना कोणतीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. |
| ९.१० | तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश होणाऱ्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीकरीता पाचारण |